ePaper

# धूर-फेसाच्या विळख्यात आळंदी; इंद्रायणीची दयनीय अवस्था



| वर्ष - 9 | अंक - 177 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™



पान 2 वरुन...

हडपसरमध्ये मजुरांच्या वसाहतीत आग

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 22 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## बारावीच्या परीक्षेपूर्वीच गोंधळ : राज्याच्या शिक्षण क्षेत्रात खळबळ


# परीक्षेआधीच पेपर फुटला!

**महाईन्यूज । नागपूर**


**शहरात बारावी (HSC) परीक्षेतील पेपर फुटल्याच्या धक्कादायक प्रकारामुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. नागपूरच्या सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर बारावीच्या विज्ञान शाखेतील केमिस्ट्री आणि फिजिक्स या दोन विषयांचे पेपर परीक्षेपूर्वीच व्हॉट्सअॅपवर प्रसारित झाल्याचं समोर आलं. या प्रकरणी सदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, ‘XII’ नावाने तयार करण्यात आलेल्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर सकाळी 10 वाजून 37 मिनिटांनी केमिस्ट्रीचा पेपर अपलोड करण्यात आला होता. परीक्षा सुरू होण्याच्या सुमारे तासाभर आधीच पेपर ग्रुपवर फिरत असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे.

एक विद्यार्थिनी दुपारी 12 वाजता परीक्षा केंद्रातील स्वच्छतागृहात गेली होती. ती परत येण्यासाठी 15 मिनिटांपेक्षा अधिक वेळ लागल्याने पर्यवेक्षकांना संशय आला. चौकशीत तिच्याकडून मोबाईल जप्त करण्यात आला. मोबाईल तपासल्यावर फिजिक्स आणि केमिस्ट्रीचे पेपर परीक्षेपूर्वीच व्हॉट्सअॅपवर आल्याचे आढळले. त्यानंतर संबंधित विद्यार्थिनीने दुसऱ्या विद्यार्थिनीचे नाव सांगितले. तिच्या बॅगेतूनही मोबाईल सापडला असून ती देखील त्याच ‘XII’ व्हॉट्सअॅप ग्रुपची सदस्य असल्याचे स्पष्ट झाले.









> “प्राथमिक तपास सुरू असून संबंधित सर्व विद्यार्थ्यांची आणि इतर व्यक्तींची चौकशी केली जाणार आहे. पेपर फुटल्याच्या घटनेत कोणाचा सहभाग आहे, हे तपासानंतर स्पष्ट होईल.
>
> – डॉ. शिवलिंग पटवे, अध्यक्ष, म.रा.शि.मं.

## 21 विद्यार्थ्यांचा व्हॉट्सअॅप ग्रुप

‘XII’ व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये एकूण 21 विद्यार्थी असल्याची माहिती समोर आली आहे. या ग्रुपमधील इतर विद्यार्थी शहरातील वेगवेगळ्या परीक्षा केंद्रांवर परीक्षा देत होते. सर्व सदस्यांची चौकशी केली जाणार असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले आहे. शहरात असे आणखी किती व्हॉट्सअॅप ग्रुप कार्यरत होते, याचाही तपास सुरू आहे.

## शिक्षण मंत्र्यांचे चौकशीचे आदेश...

सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची बदली या गंभीर प्रकारानंतर सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावरील सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. केंद्रप्रमुखांनी घटनेची माहिती पोलिसांना दिल्यानंतर या प्रकरणी अधिकृत गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी या संपूर्ण प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.





## खासगी शिकवणी शिक्षकावर आरोप

प्राथमिक चौकशीत दोन्ही विद्यार्थिनींनी खासगी शिकवणी वर्गातील एका शिक्षकाने पैसे घेऊन पेपर फोडल्याचा आरोप केला आहे. मात्र, या ग्रुपचा प्रत्यक्ष किती वापर झाला आणि आर्थिक व्यवहार झाले का, याचा तपास सुरू असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नागपूर विभागाचे अध्यक्ष डॉ. शिवलिंग पटवे यांनी दिली.

# हडपसरमध्ये मजुरांच्या वसाहतीत आग

## अग्नीशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात

**महाईन्यूज । पुणे**

**हडपसर भागातील राममनोहर लोहिया उद्यानाजवळ असलेल्या मजुरांच्या वसाहतीत शनिवारी मध्यरात्री आग लागली. आगीत १९ झोपड्या, तसेच तीन दुचाकी भस्मसात झाल्या. आग लागल्यानंतर मजूर, तसेच कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. आगीमागचे कारण समजू शकले नाही.**

पुणे-सोलापूर रस्त्यावर राममनोहर लोहिया उद्याना आहे. उद्यानाच्या मागील बाजूस मजुरांची वसाहत आहे. मध्यरात्री अडीचच्या सुमारास वसाहतीतील एका झोपडीला आग लागली. झोपड्या तात्पुरत्या स्वरुपात बांबू आणि पत्र्याचा वापर करुन बांधण्यात आल्या आहेत. गृहोपयोगी साहित्याने पेट घेतल्यानंतर आग भडकली. आग भडकल्यानंतर शेजारी असलेल्या झोपड्यांनी पेट घेतला. आग लागलात वसाहतीतील मजूर आणि कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पाच बंब, टँकर घटनास्थळी दाखल झाले. आग भढकल्याने जवानांनी चहुबाजूंनी पाण्याचा मारा सुरू केला. दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले.





### बोपोडीत भंगार मालाच्या दुकानात आग

बोपोडीतील छाजेड पेट्रोल पंपाजवळ असलेल्या भंगार मालाच्या दुकानाला शनिवारी पहाटे आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली. आगीत कोणी जखमी झाले नाही, अशी माहिती अग्निशमन दलाकडून देण्यात आली. उन्हाळा सुरू झाल्यानंतर आग लागण्याच्या घटना वाढतात. उष्णतेमुळे आग भडकते. शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याच्या घटना घडतात, अशी माहिती अग्निशमन दलाकडून देण्यात आली.

आगीत १९ झोपड्या भस्मसात झाल्या, तसेच तीन दुचाकीही जळल्या. आगीत कपडे, धान्य, तसेच अन्य साहित्य जळाले. मध्यरात्री आग लागल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती.

### कुटुंबीयांना अश्रू अनावर

हडपसरमधील राम मनोहर लोहिता उद्यानाजवळ तात्पुरत्या स्वरुपात झोपड्या उभारण्यात आल्या आहेत. या भागात राहणारे मजूर आणि कुटुंबीयांचे हातावर पोट आहे. आग लागल्यानंतर त्वरीत वसाहतीत सर्वजण बाहेर पडल्याने गंभीर दुर्घटना टळली. आगीत गृहोपयोगी साहित्य जळाल्याने मजुरांच्या कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले.

मात्र, प्रसंगावधान राखून मजूर आणि कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. अग्निशमन अधिकारी प्रमोद सोनवणे, विलास दडस यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली.

# धूर-फेसाच्या विळख्यात आळंदी; इंद्रायणीची दयनीय अवस्था

**महाईन्यूज । पुणे**

**तीर्थक्षेत्र आळंदी येथे सध्या पर्यावरणाचा भीषण आणीबाणीचा प्रसंग निर्माण झाला आहे. एका बाजूला कचरा डेपोला लागलेल्या आगीचा विषारी धूर परिसरात पसरला आहे, तर दुसरीकडे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणी वाहणारी पवित्र इंद्रायणी नदी रासायनिक फेसाच्या पांढऱ्या चादरीखाली गुदमरते आहे. आकाशात धुराचे ढग आणि नदीपात्रात फेस अशी दुहेरी प्रदूषणाची स्थिती निर्माण झाली असून, आळंदीचा श्वास अक्षरशः कोंडला आहे.**



गेल्या तीन दिवसांपासून कचरा डेपोची आग धुमसत असून, अग्निशमन दलाचे प्रयत्न अपुरे पडत असल्याचे चित्र आहे. उष्णतेमुळे वाऱ्याचा वेग मंदावल्याने धूर जमिनीलगतच रेंगाळत आहे. त्यामुळे कचरा वाहतूक करणारे ट्रॅक्टर चालक, घंटागाडी कर्मचारी आणि परिसरातील रहिवाशांना श्वसनाचा तीव्र त्रास होत आहे. डोळ्यांची आग, घशात खवखव, सतत खोकला अशा तक्रारी वाढल्या आहेत. कचरा जळताना निर्माण होणाऱ्या डायऑक्सिनसारख्या विषारी वायूंमुळे दीर्घकालीन आजारांचा धोका निर्माण झाला आहे.

गेल्या वर्षभरात डेपोला वारंवार आगी लागल्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र, प्रत्येक वेळी आग विझवण्यापुरतीच कार्यवाही होत असल्याची स्थानिकांची तक्रार आहे. आगीमुळे डेपोचे संरक्षक पत्रे जळून खाक झाले असून, विद्युत यंत्रणा कोलमडली आहे. तरीही कोणताही अधिकृत चौकशी अहवाल जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे कचरा व्यवस्थापनातील त्रुटी झाकण्यासाठीच हे प्रकार घडत आहेत का, असा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नदीत सोडले जात असल्याने इंद्रायणी नदीत मोठ्या प्रमाणात पांढरा फेस साचला आहे. दुरून पाहताना नदीऐवजी रसायनांचा नाला असल्याचा भास होतो. स्नानासाठी येणाऱ्या भाविकांच्या आरोग्याशी हा थेट खेळ असून, आळंदीच्या धार्मिक व पर्यटन मूल्यालाही तडा जात आहे.

प्रशासनाने केवळ आश्वासने न देता ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. डेपोवर चोवीस तास सुरक्षा रक्षक तैनात करणे, उच्च क्षमतेचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, कचरा प्रक्रियेचे आधुनिकीकरण करणे आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

### एकीकडे आग, दुसरीकडे फेस

धुरातील सूक्ष्म कणांमुळे फुफ्फुसांचे कायमस्वरूपी नुकसान होण्याची शक्यता आहे. वारंवार लागणाऱ्या आगीनंतरही डेपोवर चोवीस तास सुरक्षा रक्षक नाहीत. मागील आगींमधील नुकसानीचा तपशील अद्याप जाहीर झालेला नाही. रासायनिक सांडपाण्यामुळे जलचर धोक्यात आले असून, भाविकांना स्नान करणेही कठीण झाले आहे.

# प्रलंबित मुद्यांवर चर्चा अन् ठोस निर्णय!

## भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांची सूचना अन् महापालिका सभागृहात तालीम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड । विशेष प्रतिनिधी**

**“पिंपरी-चिंचवड शहरातील एकूण 32 प्रभागांमध्ये निवडून आलेल्या नगरसेवकांच्या समस्या ऐकूण घ्या. त्यानंतर सभागृहात त्यावर सविस्तर चर्चा होवू द्या...” अशी सूचना भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष तथा ज्येष्ठ नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी केली होती. त्याची अंमलबजाणी सभागृहात झालेली पहायला मिळाली. त्यामुळे भाजपाची पक्षशिस्त आणि शहराच्या सूचनेला असलेले “राजकीय वजन” पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.**




> “पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सर्वसाधारण सभा हे लोकशाहीत नगरसेवकांसाठी हक्काचे व्यासपीठ आहे आणि येथे घेतले जाणारे निर्णय शहरातील नागरिकांच्या हिताशी जोडलेले असतात. शहरातील पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सेवा, वाहतूक व्यवस्था तसेच नागरिकांच्या दैनंदिन प्रश्नांवर ठोस आणि वेळेत निर्णय घेणे अत्यंत गरजेचे आहे, याकडे मी आमच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते. प्रशासन आणि सर्व पक्षीय सदस्यांनी समन्वयातून काम केल्यास पिंपरी-चिंचवडचा विकास अधिक गतीमान होईल, असा मला ठाम विश्वास आहे. नागरिकांचा विश्वास, त्यांच्या अपेक्षा आणि सक्रिय सहभाग हेच आमचे खरे बळ आहे. शहराच्या सर्वांगीण आणि शाश्वत प्रगतीसाठी मी सदैव कटिबद्ध आहोत.
> – शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील सत्ताधारी भारतीय जनता पार्टीची दुसरी सर्वसाधारण सभा दि.20 फेब्रुवारी 2026 रोजी झाली. स्थायी समिती सदस्यांसह अन्य विविध समितींच्या सदस्यांच्या नियुक्ती सभेच्या सुरूवातीलाच होती, असे अपेक्षीत होते. मात्र, सभेत सुरूवात सर्व नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील समस्या, अडचणी आणि विकासकामांचा आढावा याबाबत चर्चा केली.

नगरसेवकांनी मांडलेले सर्व मुद्दे महापौर रवि लांडगे आणि सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी ऐकूण घेतले. त्यानंतर सभेच्या शेवटी विविध विषयांवर ठोस कार्यवाहीचे आश्वासनही दिले.

दरम्यान, महापालिकेतील सत्ताधारी पक्षाने सर्वपक्षीय नगरसेवकांना सविस्तर बोलण्याची संधी आणि त्यावर सकारात्मक भूमिका घेत उत्तरही दिले. यामागील कारण काय? याबाबत प्रेक्षक गॅलरीमध्ये चर्चा सुरू झाली.

याचा मागोवा घेतल्यानंतर लक्षात आले की, भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष तथा ज्येष्ठ नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी सर्वसाधारण सभा होण्यापूर्वी झालेल्या आढावा बैठकीत सर्व नगरसेवकांच्या सूचना आणि तक्रारी ऐकूण घ्या, अशी सूचना पदाधिकाऱ्यांना दिली होती. त्यामुळे महापौरांनी आणि सत्तारुढ पक्षनेत्यानी तशी कार्यवाही केली आहे.

2017 मध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता आली. त्यानंतर राज्यात 2019 मध्ये महाविकास आघाडी आणि 2022 मध्ये पुन्हा महायुती राज्यात सत्तेत होती. विशेष म्हणजे, सुमारे 4 वर्षे प्रशासकीय राजवट असल्यामुळे भाजपाच्याच नव्हे, तर अन्य पक्षांच्या नगरसेवकांनासुद्धा प्रभागातील विकासकामे करताना अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. त्यामुळे बहुप्रतिक्षीत सर्वसाधारण सभेत सुरूवातीला चर्चासत्र व्हावे, अशी सूचना शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी केली होती.

महापालिका निवडणुकीत भाजपाने 128 पैकी सर्वाधिक 84 जागा जिंकल्या आहेत. राष्ट्रवादीने 37 आणि शिवसेना पक्षाने 5 जागा मिळवल्या आहेत. इतर अर्थात भाजपा पुरस्कृत असलेली 1 जागा आहे. त्यामुळे मोठे संख्याबळ असल्यामुळे पक्षाने शहरातील ज्या प्रलंबित प्रश्नांच्या मुद्यांवर ही निवडणूक लढवली आणि विकासकामांचे मुद्दे पिंपरी-चिचंवडकरांसमोर ठेवले होते. त्या मुद्यांवर पहिल्यादा सविस्तर चर्चा व्हावी, अशी सूचना काटे यांनी केली. त्यामुळे सभागृहात विधायक चर्चा आणि फलदायी निर्णय झालेले पहायला मिळाले.

# ‘पीसीसीओई’चे ड्रोन तंत्रज्ञान आपत्तीत उपयोगी : विठ्ठल काळभोर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**नॅशनल इनोव्हेशन चॅलेंज फॉर ड्रोन ॲप्लीकेशन अँड रिसर्च (निडर २०२५-२६) या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये पीसीसीओई महाविद्यालयाने "आपत्ती व्यवस्थापन" विभागात सादर केलेला ड्रोन प्रकल्प सर्व तांत्रिक अटी, शर्ती पूर्ण करून रौप्यपदक आणि चार लाख रुपयांच्या बक्षीसाचा मानकरी ठरला.**




आपत्ती व्यवस्थापनात आणीबाणीच्या प्रसंगी उद्भवणाऱ्या परिस्थितीत बचाव कार्य करण्यासाठी पीसीसीओईने पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञान वापरून विकसित केलेले हे ड्रोन उपयोगी ठरेल असे प्रतिपादन पीसीईटीचे सचिव विठ्ठल काळभोर यांनी केले.

नवी दिल्ली, ग्रेटर नोएडा येथील गौतम बुद्ध विद्यापीठ येथे आयोजित केलेल्या नॅशनल इनोव्हेशन चॅलेंज फॉर ड्रोन ॲप्लिकेशन अँड रिसर्च (NIDAR) या स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (पीसीसीओई) रौप्य पदक विजेत्या "टीम मॅव्हरिक इंडिया" आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांचा सत्कार पीसीईटीचे सचिव विठ्ठल काळभोर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओई संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, डीन आर अँड डी डॉ. नरेंद्र देवरे, विभाग प्रमुख डॉ. पद्माकर देशमुख, प्रा. अमित पंचवाडकर, चंदन इंगोले, प्रा. अजय गाडे आणि टीम मधील यशस्वी विद्यार्थी उपस्थित होते.

या स्पर्धेत भारतातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयामधील ३५१ विद्यार्थी संघांनी सहभाग घेतला होता.

या प्रकल्प प्रणालीसाठी महाराष्ट्र फास्टनर्स प्रा. लि., डसॉल्ट सिस्टम्स, एएनएसवायएस, कार्बोनेक्स्ट इंडिया प्रा. लि., डीआरके स्टोअर, एम पॉवर लिथियम, एमएडी कंपोनेंट्स, ट्रेड सिंडिकेट, रॅपिड प्रिंट्स आणि विराग इंडस्ट्रीज प्रा. लि. कंपन्यांनी सहकार्य केले.

### पूर्णपणे स्वदेशी ड्रोन

पीसीसीओई संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सांगितले कि, पीसीसीओई टीम मॅव्हरिक इंडिया मधील ऋतिक लीपाटे आणि निमिषा खलाबे यांच्या नेतृत्वाखालील टीमने आपत्ती व्यवस्थापनात आणीबाणीच्या प्रसंगी उद्भवणाऱ्या परिस्थितीत बचाव कार्य करण्यासाठी पूर्णपणे स्वदेशी, फील्ड - डिप्लोएबल, स्वायत्त हवाई प्रणाली वापरून सादर केलेला ड्रोन स्पर्धेत आकर्षण ठरला. या ड्रोन मध्ये आपत्तीग्रस्त काळात उद्भवलेल्या परिस्थितीवर पाळत ठेवणे आणि वाचलेल्यांना शोधण्यासाठी, ३-मीटर व्हीटीओएल आणि अचूक वैद्यकीय किट वितरणासाठी हेक्साकॉप्टर यांचा समावेश आहे.

ही प्रणाली थर्मल इमेजिंग, ऑनबोर्ड मशीन लर्निंग, रिअल टाइम जीपीएस समन्वय आणि थेट व्हिडिओ स्ट्रीमिंग एकत्रित करते, त्यामुळे अचूकपणे नियोजन करून निर्णय घेता येतात. यामुळे जीवित, वित्तीय हानी टाळता येईल आणि परिस्थितीवर नियंत्रण मिळवता येईल.

# एपस्टिन प्रकरण: न्यायाचा काळोख!



**भूमिका**

**अमेरिकेतील उद्योगपती आणि गुन्हेगार जेफ्री एपस्टिन याचे नाव जागतिक स्तरावर भीषण लैंगिक शोषण प्रकरणाशी जोडले गेले आहे. अल्पवयीन मुलींच्या शोषणाच्या आरोपांनी संपूर्ण जग हादरले. सत्ता, संपत्ती आणि प्रसिद्धीच्या झगमगाटामागे दडलेला अमानुष अंधार या प्रकरणातून उघड झाला.**

खासगी बेटे, विमाने आणि उच्चभ्रू मेळावे यांच्या आडून पीडित मुलींना जाळ्यात ओढले जात असल्याचे समोर आले. या प्रकरणाने समाजातील नैतिकतेच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले.

एपस्टिनसोबत गिलीन मॅक्सवेल हिचेही नाव पुढे आले. मुलींच्या तस्करीत तिचा सहभाग सिद्ध झाला आणि तिला शिक्षा ठोठावण्यात आली. २०१९ मध्ये एपस्टिनचा तुरुंगात संशयास्पद मृत्यू झाला; मात्र त्याच्याशी संबंधित अनेक प्रश्न अनुत्तरितच राहिले. अमेरिकेच्या न्याय विभागाने प्रसिद्ध केलेल्या कागदपत्रांमध्ये हजारो नोंदी, साक्षी आणि पुरावे असल्याचे सांगितले जाते. या नोंदींमधून अनेक प्रभावशाली व्यक्तींशी त्याचे संबंध असल्याची चर्चा रंगली.

ब्रिटनच्या राजघराण्यातील अँड्र्यू माऊंटबॅटन विंडसर यांचे नावही या प्रकरणात पुढे आले. त्यांच्या संदर्भातील आरोपांमुळे ब्रिटनमध्ये मोठी खळबळ उडाली. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी महिलांविरोधातील गुन्ह्यांबाबत कठोर भूमिका घेत, न्यायप्रक्रियेत कोणालाही सूट मिळणार नाही, असे स्पष्ट केले. या घडामोडींनी सत्ता आणि कायदा यांचे नाते नव्याने तपासले जात असल्याचे दिसून आले.

अमेरिकेतील राजकीय वर्तुळातही या प्रकरणाचे पडसाद उमटले. काही नेत्यांनी सर्व कागदपत्रे पूर्णपणे जाहीर करण्याची मागणी केली, तर गोपनीयतेच्या कारणास्तव काही माहिती लपवून ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे नावही चर्चेत आले; मात्र न्यायालयात त्यांच्यावर ठोस आरोप सिद्ध झालेले नाहीत. या सर्व घटनांमुळे न्यायव्यवस्था, पारदर्शकता आणि सार्वजनिक विश्वास यांबाबत व्यापक चर्चा सुरू झाली.

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पीडितांचे संरक्षण. अनेक मुलींच्या आयुष्यावर या गुन्ह्यांनी खोल जखमा केल्या आहेत. न्यायप्रक्रियेत त्यांची ओळख सुरक्षित ठेवणे, सन्मान राखणे आणि आवश्यक आधार देणे ही यंत्रणांची जबाबदारी आहे. केवळ सनसनाटी निर्माण करण्यासाठी अप्रमाणित माहिती पसरवणे तितकेच धोकादायक ठरते. न्याय ही भावना नसून एक काटेकोर प्रक्रिया आहे, आणि ती निःपक्षपाती असली पाहिजे.



या प्रकरणातून दोन धोके स्पष्ट होतात. एक म्हणजे प्रभावशाली व्यक्तींवर कारवाई टाळली जाण्याची भीती; आणि दुसरा म्हणजे पुराव्यांशिवाय सार्वजनिक दोषारोप. दोन्ही गोष्टी समाजातील विश्वास ढासळवतात. कायद्यापुढे सर्व समान आहेत, ही संकल्पना प्रत्यक्षात उतरली पाहिजे.

संपत्ती आणि प्रतिष्ठा कोणालाही कायद्याच्या वर नेऊ शकत नाहीत, हा मूलभूत संदेश या प्रकरणातून मिळतो. तपास अपुरा, विलंबित किंवा अपारदर्शक राहिला, तर संशय कायम राहतो. म्हणूनच सत्य, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक आहे. अन्यथा समाजाचा नैतिक पाया कमकुवत होतो.

हे प्रकरण केवळ एखाद्या व्यक्तीच्या गुन्ह्यांची कथा नसून व्यवस्थेतील उणिवा दाखवणारा कठोर धडा आहे. अत्याचार कितीही लपवले, तरी ते शेवटी उघड होतात. समाजाने या घटनेतून शिकून न्याय आणि नैतिकता यांना सर्वोच्च स्थान दिले, तरच सार्वजनिक विश्वास पुन्हा दृढ होऊ शकतो.

## प्रासंगिक »

### मनाची निर्मळता

***गुरु आणि शिष्य भ्रमंतीसाठी जंगलात गेले होते. वाटेत त्यांना एक झरा दिसला. गुरुजींना तहान लागल्याने त्यांनी शिष्याला कमंडलू देऊन पाणी आणायला सांगितले.***

शिष्य झऱ्याजवळ गेला तर नुकत्याच गेलेल्या बैलगाड्यांमुळे पाणी गढूळ झालेले होते. पानांनी आणि चिखलाने ते मळकट दिसत होते. त्याने ते पाणी आणणे योग्य नाही असे समजून परत येऊन गुरुजींना सांगितले. गुरुजींनी त्याला पुन्हा प्रयत्न करण्यास सांगितले. असे चार-पाच वेळा झाले. प्रत्येक वेळी पाणी गढूळच दिसत होते.

शेवटी गुरुजींनी पुन्हा पाठवले. यावेळी मात्र पाणी शांत झाले होते. चिखल खाली बसला होता आणि झऱ्याचे पाणी स्वच्छ, निर्मळ दिसत होते. शिष्याने ते पाणी आणले. गुरुजी म्हणाले, "वत्सा, आपल्या मनातही कुविचारांचे बैल धावतात आणि मन गढूळ करतात. पण आपण संयम ठेवला, तर विचार शांत होतात आणि मन निर्मळ होते. म्हणून भावनेच्या भरात निर्णय घेऊ नयेत."

**तात्पर्य :** मन शांत ठेवले तर योग्य निर्णय घेता येतात; भावनेच्या भरात कृती करू नये.

वेसण आहे, चाबूकही आहे; पण त्यांचा वापरच झाला नाही तर जनावर उधळते—हे प्राचीन शहाणपण आजच्या लोकशाही संस्थांनाही लागू पडते. अधिकार आणि जबाबदारी यांचा समतोल ढासळला की व्यवस्था भरकटते.

## निर्देशांचा परिणाम की उपदेशांचा प्रभाव?

न्यायालयाने वेळोवेळी हस्तक्षेप करून निर्देश दिले, तरी तीच प्रकरणे पुन्हा पुन्हा समोर येत असतील, तर प्रशासनाला अधिकार व जबाबदारीचे भान नाही, असा अर्थ काढण्याची मुभा न्यायालयास आहे.

अलीकडे सर्वोच्च न्यायालयापुढे आलेले दोन विषय याचे उदाहरण ठरतात मोफत योजनांचा प्रश्न आणि द्वेषमूलक वक्तव्यांचा मुद्दा. 'रेवडी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोफत योजनांवर २०१३ पासूनच न्यायालयीन सुनावण्या झाल्या. मतदारांना आकर्षित करण्यासाठी मोफत वस्तूंची आश्वासने देणे योग्य का, हा प्रश्न तेव्हाच उपस्थित झाला होता. न्यायालयाने कठोर आदेश न देता निर्देश दिले नियमावली तयार करा, पारदर्शकता ठेवा. मात्र पुढील काळात ठोस अंमलबजावणी दिसली नाही. परिणामी हा विषय पुन्हा न्यायालयात यावा लागला. निवडणूक आयोगाने जाहीरनाम्यात खर्चाचा तपशील देण्याचे बंधन घातले, पण मूलभूत प्रश्न कायम राहिला निर्देशांची अंमलबजावणी कोण करणार?

दुसरा विषय म्हणजे द्वेषोक्ती. समाजात तणाव वाढवणारी वक्तव्ये नवीन



नाहीत; पण अलीकडच्या काळात त्यांचे प्रमाण आणि तीव्रता वाढल्याची भावना आहे. सर्वोच्च न्यायालयाने २०२३ मध्ये राज्यांना स्पष्ट निर्देश दिले की अशा प्रकरणांत गुन्हे नोंदवले जावेत. तरीही त्याच प्रकारच्या तक्रारी पुन्हा न्यायालयात येतात. काही कार्यकर्त्यांनी विशिष्ट घटनांविरुद्ध याचिका दाखल केली असता न्यायालयाने समतोल साधण्याचा सल्ला दिला. पण प्रश्न कायम राहतो पूर्वीचे निर्देश प्रत्यक्षात कितपत पाळले गेले?

न्यायालयाचे काम कायदे तयार करणे नाही; ते कायद्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते का, हे पाहणे आहे. मात्र जेव्हा निर्देश वारंवार निष्फळ ठरतात, तेव्हा न्यायालयीन सक्रियतेचा प्रश्न उभा राहतो. २०१६ मध्ये अरुणाचल प्रदेशातील राजकीय घडामोडींमध्ये सर्वोच्च न्यायालयाने थेट हस्तक्षेप करून संसदीय प्रक्रियेचा मार्ग आखून दिला होता. म्हणजेच गरज भासल्यास न्यायालय अधिकार वापरते. मग इतर बाबतीत केवळ निर्देश देऊन थांबणे पुरेसे ठरते का?

पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांच्या फेरतपासणीबाबत दिलेल्या अलीकडील निर्णयातून न्यायालयाने दाखवून दिले की आवश्यक असल्यास कठोर पावले उचलता येतात. मुद्दा विशिष्ट राज्याचा नसून, न्यायालयीन निर्देशांचे परिणामकारकत्वाचा आहे. जर रेवडी किंवा द्वेषोक्ती यांसारखी प्रकरणे पुन्हा पुन्हा न्यायालयात येत असतील, तर अन्य यंत्रणांनी आपली जबाबदारी पार पाडली का, हा प्रश्न अनिवार्य ठरतो.

लोकशाहीतील प्रत्येक स्तंभ विधिमंडळ, कार्यकारी आणि न्यायपालिका यांना आपापल्या मर्यादा व जबाबदाऱ्या आहेत. न्यायालयाने दिलेले निर्देश पोकळ उपदेश ठरू नयेत, यासाठी प्रशासनाने तत्परता दाखवली पाहिजे. अन्यथा लोकांमध्ये "सर्वांना राज्यघटना मान्य आहे" हा केवळ औपचारिक उच्चार राहतो, प्रत्यक्ष कृती मात्र ढिली पडते.

## ।। अभंगवाणी ।।



कर कटावरी तुळसीच्या माळा ।
ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥१॥

ठेविले चरण दोन्ही विटेवरी ।
ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ध्रु.॥

\- संत तुकाराम


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अर्थसंकल्पीय अधिवेशन विरोधी पक्षनेत्यांविना

## इतिहासात पहिल्यांदाच दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेता नाही...

**महाईन्यूज । मुंबई**

**विधानसभेपाठोपाठ विधान परिषदेचे विरोधी पक्षनेतेपद रिक्त असल्याने अर्थसंकल्पीय अधिवेशनात उभय सभागृहांचे कामकाज विरोधी पक्षनेताविना पार पडेल, अशी एकूण चिन्हे आहेत. राज्याच्या इतिहासात दोन्ही सभागृहांची विरोधी पक्षनेतेपद रिक्त असण्याचा प्रकार पहिल्यांदात घडत आहे.**



२०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर १५ वी विधानसभा गठीत झाली. नव्या विधानसभेचे पहिले अधिवेशन डिसेंबर २०२४ मध्ये पार पडले. सर्वसाधारणपणे पहिल्या अधिवेशनात विरोधी पक्षनेत्याची निवड होते. मात्र विरोधी बाकावरील सर्वात मोठ्या पक्षाच्या सदस्यांची संख्या ही एकूण विधानसभा सदस्य संख्येच्या १० टक्के इतकी नसल्याचे कारण देत विधानसभा अध्यक्षांकडून विरोधी पक्षनेते पदाचा निर्णय प्रलंबित ठेवण्यात आला आहे.

ठाकरे गटाचे माजी आमदार अंबादास दानवे यांची विधान परिषदेची मुदत संपल्यानंतर विधानसभेप्रमाणे विधानपरिषदेतही हेच चित्र निर्माण झाले. नागपूर अधिवेशनात विरोधी पक्षनेत्याचा मुद्दा चर्चेत आला तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षनेते पदाचा निर्णय हा विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषद सभापतींच्या अखत्यारीतील असल्याचे सांगितले होते. त्यांनी घेतलेला निर्णय सरकारला मान्य असेल. विरोधी पक्षनेतेपदाबाबत सरकारचा कोणताही दुराग्रह नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले होते. तर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षनेतेपदाबाबत नियमांचा अभ्यास सुरू असल्याचे स्पष्ट केले होते. विधानसभेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे २० आमदार आहेत. शिवसेना ठाकरे गटाकडून विधानसभा विरोधी पक्षनेते पदासाठी ज्येष्ठ आमदार भास्कर जाधव यांच्या नावाची शिफारस करणारे पत्र ४ मार्च २०२५ रोजी देण्यात आले. या पत्राला पुढील महिन्यात एक वर्ष पूर्ण होईल.

ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये संपली. त्यामुळे काँग्रेसने विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांना डिसेंबर २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षनेतेपदासाठी सतेज पाटील यांच्या निवडीचे पत्र दिले होते. विरोधी पक्षाच्या या दोन्ही पत्रांवर अजून कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे गेल्या डिसेंबरच्या हिवाळी अधिवेशनाप्रमाणे येत्या सोमवारपासून (२३ फेब्रुवारी) सुरू होणारे अर्थसंकल्पीय अधिवेशनसुद्धा विरोधी पक्षनेत्याविना पार पडणार आहे.

काँग्रेसच्या प्रज्ञा सातव यांनी भाजपमध्ये प्रवेश करताना आमदारकीचा राजीनामा दिला. परिणामी काँग्रेस आमदारांचे संख्याबळ सहा झाले. त्यातच राजेश राठोड यांची मुदत पुढील महिन्यात संपुष्टात येत आहे. यामुळे काँग्रेसचे संख्याबळ आणखी कमी होईल. सातपेक्षा संख्याबळ कमी असल्याने दहा टक्क्यांचा निकष पूर्ण होत नसल्याच्या मुद्द्यावर काँग्रेसचे विरोधी पक्षनेतेपद अडवून ठेवले जाईल, अशी चिन्हे आहेत.

### विरोधी पक्षनेतेपद रिक्त

राज्यातील विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहांत विरोधी पक्षनेतेपदे अद्याप रिक्तच आहेत. १० टक्के संख्याबळाचा निकष पूर्ण न झाल्याने निर्णय प्रलंबित ठेवण्यात आला आहे. त्यामुळे २३ फेब्रुवारीपासून सुरू होणारे अर्थसंकल्पीय अधिवेशन सलग दुसऱ्यांदा विरोधी पक्षनेताविना पार पडण्याची शक्यता आहे.

# आम्हाला आता गोळ्या घाला अन् मग शक्तिपीठसाठी जमीन मोजा..!

**महाईन्यूज । परभणी**

**आम्हाला गोळ्या घाला अन् जमीन मोजा, असा आक्रोश करणाऱ्या शेतकऱ्यांना जनावरांसारखे ओढून बाजूला करीत शक्तिपीठ महामार्गासाठी प्रशासनाने प्रचंड पोलिस फौजफाट्यासोबत जबरदस्तीने जमीन मोजणी सुरू केल्याचा प्रकार तालुक्यातील सहजपूर जवळा येथे घडला.**



प्रशासनाकडून शक्तिपीठ महामार्गासाठी देण्यात आलेल्या नोटिसा शेतकऱ्यांनी स्वीकारण्यास नकार दिल्यानंतर शुक्रवारी मध्यरात्री कलम १६८ अन्वये नोटिसा घरांवर चिटकविण्यात आल्या. तसेच बीएनएस १६३ अंतर्गत निर्बंध लागू करून गटधारकांशिवाय इतरांना गावात प्रवेशबंदी करण्यात आली. त्यानंतर जिल्ह्यातील ५०हून अधिक शेतकऱ्यांना मध्यरात्री ताब्यात घेऊन ताडकळस व दैठणा, पूर्णा, नानलपेठ पोलिस ठाण्यात हलविण्यात आले. या कारवाईमुळे ग्रामस्थांमध्ये संताप आणि भीतीचे वातावरण होते. मोजणीला विरोध करण्यासाठी शेतकरी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. घोषणाबाजी व रास्ता रोको आंदोलनामुळे काहीकाळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. आम्हाला आता शासनाने गोळ्या घालाव्यात अन् मगच आमची जमीन बळकवावी, अशी संतप्त प्रतिक्रिया या शेतकऱ्यांमधून उमटली.

एका शेतकरी कुटुंबाने मोजणीला विरोध करताना सोबत पेट्रोलची बाटली आणली. तुमचा मावेजा नको, आमची जमीनही घेऊ नका, असे ते ओरडून सांगत होते. मात्र प्रशासन हट्टाला पेटल्याने पेट्रोलची बाटलीच काढत मला मरू द्या, असे म्हणत या कुटुंबानेच टाहो फोडला.

महसूल व पोलिस प्रशासन कशामुळे दडपशाही करीत आहे. आमच्या गावातून बाहेर निघा, असे म्हणत ग्रामस्थांनी सहजपूर रस्ताच अडविला. त्यावेळी प्रशासन दमदाटी करीत असल्याने महिलांनी एकच आक्रोश केला. मात्र पुरुषांसह त्यांनाही गुराढोरांसारखे अमानुषपणे ओढून नेत ताब्यात घेतल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. काही काळानंतर त्यांना सोडण्यात आले.



# तिकिटाचा काळाबाजार करणाऱ्या दोघांना पकडले

**महाईन्यूज । पुणे**

मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाने पुणे विभागातील सातारा जिल्ह्यातील वाठार रेल्वे स्थानकावर तत्काळ तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्या दोन जणांना गुरुवारी सापळा रचून रंगेहात पकडले. आरोपींकडील मोबाईल तपासात सुमारे ६० हजार रुपयांची सक्रिय आरक्षित तिकिटे आढळली.

माहितीनुसार, संबंधित व्यक्ती अवैध मार्गाने तत्काळ तिकिटे काढून चढ्या दराने विक्री करत असल्याची तक्रार मिळाल्यानंतर कारवाई करण्यात आली. प्राथमिक चौकशीत त्यांनी अनेक दिवसांपासून हा प्रकार सुरू असल्याचे समोर आले. काही दिवसांत सुमारे एक लाख रुपयांची तिकिटविक्री केल्याचीही नोंद आढळली.

या प्रकरणात प्रवाशांची आर्थिक फसवणूक झाल्याची शक्यता व्यक्त होत असून दोघांना रेल्वे सुरक्षा दलाच्या ताब्यात देण्यात आले आहे. या गैरप्रकारात अन्य कोणी सहभागी आहे का, याचा पुढील तपास सुरू आहे.

# AI समिटमध्ये युवक काँग्रेसचे निदर्शन; नेपाळच्या Gen-Z आंदोलनाची प्रेरणा?

## न्यायालयीन सुनावणीत पोलिसांना 'मोठ्या कटाचा' संशय

महाईन्यूज | नवी दिल्ली

**नवी दिल्लीत नुकतीच 'एआय इम्पॅक्ट समिट' पार पडली. खरं तर ही समिट एका रोबोडॉगवरुन चांगलीच गाजली. या समिटमध्ये नोएडाच्या गलगोटियास विद्यापीठाने चिनी बनावटीचा रोबोटिक डॉग स्वतः विकसित केल्याचा दावा केला. त्यामुळे या समिटची अवघ्या देशात चर्चा झाली. एवढंच नाही तर या समिटमध्ये युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी टी-शर्ट काढून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे समिटमध्ये मोठा गोंधळ उडाला.**

दरम्यान, युवक काँग्रेसच्या या कार्यकर्त्यांनी "PM IS COMPROMISED" (पंतप्रधानांनी तडजोड केली) अशा घोषणा दिल्या. पण या गोंधळानंतर युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेत कारवाई केली. यानंतर या युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना न्यायालयात हजर करण्यात आलं असता न्यायालयाने त्यांना ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. मात्र, यावेळी पोलिसांनी काँग्रेसच्या या आंदोलनाबाबत न्यायालयात एक धक्कादायक दावा केला आहे.

'युवक काँग्रेसचं एआय समिटमधील निदर्शन हे नेपाळच्या GEN-Z आंदोलनापासून प्रेरित होतं', असा दावा दिल्ली पोलिसांनी केला आहे. दिल्ली पोलिसांनी न्यायालयात सांगितलं की, या निदर्शनामागे मोठा कट असल्याचा संशय आहे. एआय समिटमधील आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींच्या उपस्थितीत अंगावरील कपडे काढून आंदोलन करण्यात आल्याने युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.




### युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नेमकं काय केलं होतं?

दिल्लीतील इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमध्ये युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी टी-शर्ट काढून घोषणाबाजी करत गोंधळ केला होता. युवक काँग्रेसचे काही कार्यकर्ते टी-शर्ट काढून आतमध्ये घुसले होते. यावेळी कार्यकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात घोषणाबाजी केली होती. यावेळी कार्तकर्ते आणि येथील अधिकाऱ्यांमध्ये बाचाबाची झाली होती, त्यामुळे या कार्यक्रमात मोठा गोंधळ पाहायला मिळाला होता.

### भाजपाकडून काँग्रेसवर टीका

युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या कृतीचे काँग्रेसकडून राहुल गांधींचे सोल्जर म्हणत कौतुक करण्यात आले. तर, भाजपाने काँग्रेसवर सडकून टीका केली. केंद्रीय मंत्री पियूष गोयल, किरेन रिजिजू भाजपा खासदार संबित पात्रा यांनी काँग्रेसवर कठोर शब्दात टीका केली. राहुल गांधी यांच्या निवासस्थानी याबाबत सर्व नियोजन झाल्याचा आरोप खासदार संबित पात्रा यांनी केला.

---

# आत्मघातकी स्फोटाने पाकिस्तान हादरला; कर्नलसह ३ सैनिक ठार

महाईन्यूज | नवी दिल्ली

**पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा (KP) प्रांतातील बन्नू जिल्ह्यात एक मोठा आत्मघातकी हल्ला झाला. या हल्ल्यात तीन सुरक्षा कर्मचारी ठार झाले. मृतांमध्ये लेफ्टनंट कर्नल दर्जाचा एक अधिकारी समाविष्ट होता. यासह एका नागरिकाचाही मृत्यू झाला असून, इतर अनेक सैनिक जखमी झाले आहेत. अहवालानुसार कर्नल गुल फराजसह एकूण पाच सैनिक ठार झाले आणि चार जण जखमी झाले. गेल्या १५ दिवसांतील हा तिसरा हल्ला आहे. तर गेल्या पाच दिवसात हा दुसरा आत्मघातकी हल्ला आहे.**

बन्नूच्या सरार दर्गा परिसरात हा हल्ला झाला. एका आत्मघातकी हल्लेखोराने स्फोटकांनी भरलेली रिक्षा सुरक्षा दलाच्या एमआरपी (माइन-रेझिस्टंट ॲम्बुश प्रोटेक्टेड) वाहनावर धडकवली. एमआरपी वाहन विशेषतः अशा हल्ल्यांनाच तोंड देण्यासाठी डिझाइन केलेले आहे, परंतु स्फोट अत्यंत शक्तिशाली होता. त्यामुळे वाहनाचे मोठे नुकसान झाले.

हल्ल्याच्या वेळी, कमांडिंग ऑफिसर, लेफ्टनंट कर्नल शहजादा गुल, गुप्तचर यंत्रणेवर आधारित ऑपरेशनमध्ये सहभागी होते. ते वाहनातून बाहेर पडत असतानाच स्फोट झाला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला.



### TTPच्या कारवायांचा जोर वाढला

गेल्या काही महिन्यांपासून टीटीपी पाकिस्तानमध्ये हल्ले वाढवत आहे. या संघटनेचे उद्दिष्ट सरकार उलथवून त्यांची कट्टर इस्लामिक विचारसरणी लादणे हा आहे. टीटीपी अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर हल्ले आणि प्रशिक्षणासाठी करते असा पाकिस्तानी सरकारचा आरोप आहे. तथापि, अफगाणिस्तानने सातत्याने हे आरोप फेटाळून लावले आहेत.

# अभिनेत्री स्मिता शेवाळेचे घटस्फोटाबद्दल वक्तव्य



अभिनेत्री स्मिता शेवाळेने आजपर्यंत विविध भूमिकांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. काही दिवसांपूर्वी 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटातून अभिनेत्री प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. अभिनेत्री नेहमीच विविध कारणांमुळे चर्चेत असते. नुकतीच तिने 'अभिजात मराठी फिल्मी' या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या घटस्फोटाबद्दल वक्तव्य केले.

स्मिता शेवाळे म्हणाली, "जेव्हा माझा घटस्फोट झाला, तेव्हाचा काळ माझ्यासाठी अतिशय कठीण होता. जर मी त्यातून बाहेर आले नसते तर माझ्यातील एक कलाकार हरवला असता. मी काम करू शकले नसते, मी चांगली आई होऊ शकले नसते, मी स्वतंत्र स्त्री असू शकले नसते; आपण आयुष्य पुढे ढकलायचे म्हणून आयुष्य ढकलतो, तसे झाले असते."

अभिनेत्री पुढे म्हणाली, "मी त्यावेळी शांत राहिले, कुठे व्यक्त झाले नाही. नंतरसुद्धा एका मुलाखतीत मला प्रश्न विचारला, त्यावेळी मी खूप संयमाने, शांतपणे त्या गोष्टींकडे बघितलं. पण, हेही खरं आहे की अनेकदा अशा प्रकारचं दु:ख येतं, जिथे तुम्हाला वाटतं की माझ्याबाबतीच हे दु:ख का? मीच का? मी कोणाचं काय वाईट केलं आहे, म्हणून माझ्या बाबतीत हे घडत आहे."

"या सगळ्यात आपली चूक कुठे झाली आहे हे माहीत असेल तर त्याला सामोरे जाता येते. पण, ज्यावेळी हे माहीत असतं की आपली यामध्ये काहीच चूक नाही, त्याला कसे सामोरे जावे हे समजत नाही. पण, मला असं वाटतं की हे घडल्यामुळे मी बाऊन्स बॅक होऊन परत उभी राहिले. त्यानंतरचा माझा हा सगळा प्रवास होता, तो सगळा प्रवास महत्त्वाचा होता; म्हणून घडलेल्या ज्या वाईट गोष्टी आहेत, त्यामागेसुद्धा काही कारणे असतात. हे मी जेव्हा आता मागे वळून पाहते तेव्हा कळते. तेव्हा ते घडलं म्हणून मी खूप ताकदीने काम करू शकले."

ती पुढे म्हणाली, "आपण खूप सुरक्षित वातावरणात राहण्याचा प्रयत्न करतो आणि हे जेव्हा सगळं अचानकपणे काढून घेतलं जातं, तेव्हा आपण हादरून जातो. पण, तेव्हा जर आपण पाय रोवून उभं राहिलो की मग तुम्हाला कोणी हलवू शकत नाही.

"मला असे वाटते की, कोणाच्याही आयुष्यात वाईट गोष्टी घडूच नयेत. पण, जर अशा घडल्याच तर मी कायम म्हणते की तुम्ही थकलात, संपलात. असं वाटलं की इथून पुढे माझ्या आयुष्यात काही घडू शकत नाही; असं ज्यावेळी वाटतं तेव्हा मोठा श्वास घ्या, थोडं थांबा. तो पॉज खूप महत्त्वाचा असतो, तो गरजेचा असतो. त्यानंतर तुम्ही १०० मैल पळू शकता, इतकी ताकद तुमच्याकडे येईल. ही ताकद स्त्रीकडे तर आहेच आहे."




# तेजस्वी प्रकाशने घेतलं आलिशान घर

लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री आणि 'बिग बॉस १५' ची विजेती तेजस्वी प्रकाश सध्या तिच्या मुंबईतील नवीन घरामुळे चर्चेत आहे. तिने वांद्रे या मुंबईतील उच्चभ्रू भागात तब्बल ७.६३ कोटी रुपयांचे आलिशान अपार्टमेंट खरेदी केले आहे. तेजस्वीने मुंबईतील वांद्रे येथे हे घर घेतलं आहे. या घराची किंमत ७.६३ कोटी रुपये असून, तिने यासाठी सुमारे ३८ लाख रुपये स्टॅम्प ड्युटी भरली आहे. तेजस्वी प्रकाशने या अपार्टमेंटची नोंदणी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी केली होती. तसेच तिने ३०,००० रुपये नोंदणी शुल्क भरले. कागदपत्रांनुसार, तेजस्वीने बिल्डरला घराच्या एकूण किमतीच्या १०% रक्कम म्हणजेच ७६ लाख रुपयांहून अधिक रक्कम दिली आहे. उरलेली रक्कम इमारतीला ओसी मिळेपर्यंत १२ हप्त्यांमध्ये भरली जाईल.

तेजस्वीने यापूर्वी दुबईतही एक घर खरेदी केले आहे. आता तिने मुंबईतील हे आलिशान घर घेतले आहे. तसेच सप्टेंबर २०२२ मध्ये तेजस्वीने गोव्यात स्वतःचे घर घेतल्याची आनंदाची बातमी चाहत्यांबरोबर शेअर केली होती. हे घर तिने तिच्या आईबरोबर मिळून घेतले होते. तिचे हे घर गोव्यातील एका शांत आणि निसर्गरम्य भागात आहे. तेजस्वीच्या या घरी खासगी स्विमिंग पूल आहे. तसेच घराचे इंटेरिअर अतिशय आधुनिक आहे. सुट्ट्या घालवण्यासाठी हे उत्तम ठिकाण आहे. तेजस्वीने हे घर खरेदी केले, तेव्हा तिचा बॉयफ्रेंड करण कुंद्रा देखील तिच्याबरोबर होता. करणने सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट करून तिचे कौतुक केले होते.

# ग्लोबल स्टार 'शकीरा' भारतात करणार परफॉर्म

ग्लोबल आयकॉन शकीराचे चाहते प्रचंड आहेत आणि आता, भारतातील तिच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. शकीरा दोन दशकांनंतर लाईव्ह परफॉर्म करण्यासाठी भारतात परतत आहे आणि यावेळी, तिचा दौरा केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नाही तर एक महत्त्वाचा सामाजिक संदेश देखील घेऊन जातो.



मुंबई आणि दिल्लीतील तिच्या मेगा कॉन्सर्टबद्दल चाहते खूपच उत्सुक आहेत, कारण २००७ नंतर पहिल्यांदाच शकीरा तिच्या हिट गाण्यांसह भारतीय रंगमंचावर सादरीकरण करणार आहे.

हिप्स डोन्ट लाई, वाका वाका आणि व्हेन्हेअर, व्हेन्हेअर सारख्या हिट गाण्यांनी जगभरात ओळख मिळवलेली शकीरा फीडिंग इंडिया कॉन्सर्ट २०२६ चा भाग म्हणून सादरीकरण करणार आहे.

या कार्यक्रमाचा उद्देश केवळ संगीताचा उत्सव नाही तर मुलांमध्ये कुपोषण आणि उपासमारीबद्दल जागरूकता निर्माण करणे देखील आहे. असे म्हटले जात आहे की हा कॉन्सर्ट संयुक्त राष्ट्रांच्या झिरो हंगर मिशनशी देखील जोडलेला आहे, जो संगीताद्वारे सामाजिक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे.

संगीत कार्यक्रमांच्या तारखांबाबत, हे कार्यक्रम १० एप्रिल २०२६ रोजी मुंबईच्या महालक्ष्मी रेसकोर्स येथे आणि १५ एप्रिल २०२६ रोजी दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर आयोजित केले जातील आणि वर्षातील सर्वात मोठ्या लाईव्ह इव्हेंटपैकी एक मानले जातात.

# टीम इंडियाने ऑस्ट्रेलियात मालिका जिंकली!

## स्मृती-जेमिमाच्या अर्धशतकांनी भारताचा शानदार विजय निश्चित

**महाईन्यूज । दिल्ली**

**स्मृती मानधना आणि जेमिमा रॉड्रिग्ज या जोडगोळीच्या अर्धशतकी खेळींच्या बळावर भारतीय संघाने ऑस्ट्रेलियावर तिसऱ्या टी२० सामन्यात १७ धावांनी विजय मिळवला. या विजयासह भारतीय संघाने तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली.**





पहिल्या लढतीत भारतीय संघाने डकवर्थ लुईस पद्धतीने ऑस्ट्रेलियावर २१ धावांनी विजय मिळवला होता. दुसऱ्या लढतीत ऑस्ट्रेलियाच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर भारतीय फलंदाजांनी हाराकिली केली. २ षटकात ५ विकेट्स गमावल्यामुळे भारतीय संघाला पराभवाला सामोरं जावं लागलं. तिसऱ्या लढतीत मात्र भारतीय संघाने सर्वसमावेशक खेळ करत बाजी मारली. ऑस्ट्रेलियाच्या संघाला काही महिन्यांपूर्वी झालेल्या वर्ल्डकप स्पर्धेत सेमी फायनलमध्ये भारताविरुद्ध पराभवाला सामोरं जावं लागलं होतं. आयसीसी स्पर्धेच्या जेतेपदांवर मक्तेदारी असणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या संघासाठी हा पराभव अनपेक्षित होता. या पराभवातून ऑस्ट्रेलियाचा संघ सावरला नसल्याचं चित्र या मालिकेतून दिसलं. या मालिकेपूर्वी क्रिकेट ऑस्ट्रेलियाने महिला संघाचं नेतृत्व सोफी मोलिनक्सकडे सोपवण्याचा निर्णय घेतला. कर्णधारपदासाठी ॲशले गार्डनरचं नाव चर्चेत होतं मात्र सोफीच्या नावाला पसंती मिळाली. मायदेशात झालेल्या पहिल्याच मालिकेत सोफीच्या नेतृत्वात ऑस्ट्रेलियाला पराभवाला सामोरं जावं लागलं. यानंतर तीन सामन्यांची वनडे मालिका आणि नंतर एकमेव टेस्ट होणार आहे.

२०१७ नंतर पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाला मायदेशात अशा स्वरुपाच्या मालिका पराभवाला सामोरं जावं लागलं आहे.

ॲडलेड ओव्हल इथे झालेल्या लढतीत भारतीय संघाने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. शफाली वर्मा ७ धावा करून तंबूत परतली. यानंतर स्मृती आणि जेमिमा यांनी दुसऱ्या विकेटसाठी १२१ धावांची भागीदारी रचली. शतकाकडे कूच करणाऱ्या स्मृतीला अनाबेल सदरलँडने बाद केलं. स्मृतीने ८ चौकार आणि ३ षटकारांसह ५५ चेंडूत ८२ धावांची खेळी केली.

७ चेंडूत २ चौकार आणि एका षटकारासह १८ धावांची खेळी करत ऋचा घोष तंबूत परतली. अनाबेलनेच जेमिमालाही बाद केलं. तिने ४ चौकारांसह ४६ चेंडूत ५९ धावांची खेळी केली. भारतीय संघाने १७६ धावांची मजल मारली. ऑस्ट्रेलियातर्फे अनाबेलने २ तर किम गॅरथ, सोफी मोलिनक्स यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

उत्तम फॉर्मात असणारी जॉर्जिआ वॉल १० धावांवर बाद झाली. बेथ मूनीला रेणुकाने तंबूत परतावलं. फोबी लिचफिल्डने प्रतिकार करत २६ धावांची खेळी केली. अनुभवी एलिसा पेरी फक्त १ धावा करू शकली. जॉर्जिआ वारेहम, अनाबेल सदरलँड याही मोठी खेळी करू शकल्या नाहीत. अष्टपैलू ॲशले गार्डनरने मात्र सहकारी बाद होत असतानाही ४५ चेंडूत ५ चौकार आणि एका षटकारांसह ५७ धावांची खेळी केली. गार्डनरला अरुंधती रेड्डीने बाद केलं. गार्डनर बाद होताच ऑस्ट्रेलियाच्या विजयाच्या आशा मावळल्या. भारतातर्फे श्री चरणी आणि श्रेयांका पाटील यांनी प्रत्येकी तीन विकेट्स पटकावल्या. अरुंधती रेड्डीने २ विकेट्स घेत या दोघींना चांगली साथ दिली.

स्मृतीला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. ऑस्ट्रेलियाला ऑस्ट्रेलियात हरवणं नेहमीच खास असतं. सर्व खेळाडूंनी विजयात योगदान दिलं. जेमिमाबरोबरची भागीदारी चांगली झाली. तिने आल्या आल्या चौकार लगावत माझ्यावरचं दडपण कमी केलं असं स्मृतीने सांगितलं.

# अभिषेकच्या फॉर्मची चिंता करणाऱ्यांची चिंता वाटते; कर्णधार सूर्यकुमार

**महाईन्यूज । मुंबई**

**टीम इंडियाचा धडाकेबाज युवा सलामीवीर अभिषेक शर्मा सध्या धावांसाठी झगडताना दिसतो आहे. अभिषेकला सलग तीन सामन्यात भोपळाही फोडता आलेला नाही. यामुळे अभिषेकवर आणि पर्यायाने टीम इंडियावर दडपण वाढलं आहे. यासंदर्भात टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादवला प्रश्न विचारण्यात आले. प्रश्नांच्या भडिमाराने विचलित न होता सूर्यकुमारने प्रत्युत्तर दिलं आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या लढतीच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत सूर्यकुमार बोलत होता.**





अभिषेकच्या फॉर्मविषयी चिंता वाटते का? यावर सूर्यकुमार म्हणाला, 'ज्यांना अभिषेकच्या फॉर्मची चिंता वाटते, त्यांची मला चिंता वाटते. अभिषेक जेव्हा धावा करतो तेव्हा प्रतिस्पर्धी संघाचं काय होतं ते आपल्या सगळ्यांना ठाऊक आहे. क्रिकेट सांघिक खेळ आहे. गेले वर्ष दोन वर्ष त्याने संघासाठी खोऱ्याने धावा केल्या आहेत. एकटाकी सामने जिंकून दिले आहेत. आता त्याच्या धावा होत नसतील तर आम्ही त्याच्यासाठी खेळू. अभिषेकसंदर्भात संघाचं धोरण बदललेलं नाही. तो ज्या पद्धतीने क्रिकेट खेळतो तसंच त्याने खेळावं. संघाला आक्रमक सुरुवात मिळवून द्यावी. वर्ल्डकपमध्ये त्याच्या धावा झाल्या नसतील पण आम्हाला काळजी नाही. संघव्यवस्थापनाचा त्याच्यावर विश्वास आहे'.

तब्येत बरी नसल्याने वर्ल्डकप सुरू होण्यापूर्वी अभिषेकला रुग्णालयात दाखल करावं लागलं होतं. अमेरिकेविरुद्धच्या लढतीत अभिषेकऐवजी संजू सॅमसनला खेळवण्यात आलं. रुग्णालयातून त्याला सोडण्यात आलं. मात्र त्यानंतरही अभिषेक एक सामना खेळला नाही. पाकिस्तानविरुद्धच्या लढतीत त्याने पुनरागमन केलं. तीन सामन्यात तीन शून्य नावावर लागल्याने अभिषेकवरचं दडपण वाढलं आहे.

२५वर्षीय अभिषेक शर्मा टी२० प्रकारात झंझावाती फॉर्ममध्ये आहे. ४१ टी२० सामन्यांमध्ये १९२.४३च्या स्ट्राईकरेटने त्याने १२९७ धावा केल्या आहेत. यामध्ये २ शतकं आणि ८ अर्धशतकांचा समावेश आहे. आयसीसी टी२० फलंदाजीच्या क्रमवारीत अभिषेक शर्मा अव्वल स्थानी आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।
दि. 22 फेब्रुवारी 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# 'माझी वसुंधरा' अभियानात PCMC नं.1

## राज्यपाल- उप मुख्यमंत्री यांच्या हस्ते महापालिकेस 10 कोटी रुपयांचे पारितोषिक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि हरित उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 'माझी वसुंधरा अभियान ५.०' मध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावत सलग तिसऱ्यांदा अव्वल स्थान मिळविले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महापालिकेस १० कोटीचे बक्षिस जाहिर झाले असून आज राज्यस्तरीय आयोजीत सन्मान सोहळ्यात महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत व उप मुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते महापौर रवि लांडगे व आयुक्त श्रावण हर्डीकर यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.**




यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज,महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व हवामान बदल विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ५.०' च्या राज्यस्तरीय अंतिम निकालात, १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या गटामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रथम क्रमांक मिळवित सलग तिसऱ्यांदा राज्यात अव्वल येण्याची किमया साधली.

'माझी वसुंधरा अभियान ५.०' अंतर्गत भूमी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचमहाभूतांवर आधारित विविध पर्यावरणीय निकषांवर शहरांची कामगिरी तपासण्यात आली. या निकषांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन, स्त्रोतस्थानी कचरा विलगीकरण, निर्माल्य पुनर्प्रक्रिया प्रकल्प, एकल-वापर प्लास्टिकमुक्त मोहीम, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, जलसंधारण उपक्रम, सौरऊर्जा वापर तसेच हरित पट्टा विस्तार या क्षेत्रांत प्रभावी अंमलबजावणी केली.

शहरातील पर्यावरणीय गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा घडवून आणताना प्रशासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आणि व्यापक जनसहभागाला विशेष प्राधान्य दिले.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत सलग तिसऱ्यांदा राज्यात प्रथम क्रमांक मिळविणे हा संपूर्ण पिंपरी चिंचवडकरांसाठी अभिमानाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे. पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात शहराने सातत्यपूर्ण, नियोजनबद्ध आणि परिणामकारक कामगिरी करत राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. हे यश केवळ महापालिकेचे नसून शहरातील नगरसदस्य, नगरसदस्या, नागरिक, स्वयंसेवी संस्था, शाळा-महाविद्यालये, उद्योग क्षेत्र आणि सर्व घटकांच्या सक्रिय सहभागाचे फलित आहे.
>
> –रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड.

# मोशीत भीषण 'हिट अँड रन'; मद्यधुंद कंटेनर चालक ताब्यात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील मोशी परिसरात सोमवारी उशिरा रात्री भीषण 'हिट अँड रन'ची घटना घडली. मद्यधुंद अवस्थेत कंटेनर चालवणाऱ्या चालकाने बेफाम वेगात वाहन चालवत सात ते आठ चारचाकी वाहनांना जोरदार धडक दिली. या अपघातात अनेक वाहनांचे मोठे नुकसान झाले असून काही नागरिक जखमी झाले आहेत.**





ही घटना रात्री सुमारे साडेअकराच्या सुमारास मोशीतील बोऱ्हाडेवाडी, राजमाता जिजाऊ चौक आणि हॉटेल सिल्वर ब्लू परिसरात घडली. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित कंटेनर चाकण-हायवे रोडवरून मोशी भाजी मंडई चौक मार्गे टाटा मोटर्सच्या दिशेने जात होता. चालक मद्याच्या नशेत असल्याची माहिती समोर आली आहे.

बोऱ्हाडेवाडी परिसरात पोहोचताच चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. सुसाट वेगाने धावणाऱ्या कंटेनरने समोरून येणाऱ्या वाहनांना एकामागून एक धडक दिली. तसेच रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या गाड्यांनाही जोरदार धडक बसली. परिणामी अनेक वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला असून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, कंटेनरसमोर येणारे प्रत्येक वाहन उडवत तो पुढे सरकत होता. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढले आणि रुग्णालयात हलवण्यास मदत केली.

मोशीतील बोऱ्हाडेवाडी अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी आपली संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ते म्हणतात की रात्रीची वेळ आणि चालकाचा मद्यधुंद अवस्थेत असणे या दोन्ही कारणांमुळे ही दुर्घटना घडली. सुसाट वेगाने धावत असलेल्या कंटेनरमुळे समोर येणाऱ्या वाहनांना प्रचंड धक्का बसला आणि अनेक वाहनांचा मोठा आर्थिक नुकसान झाले. नागरिकांना प्राणहानी टळली, तरीही परिसरातील लोकांमध्ये खळबळ उडाली.

### परिसरात काही काळ तणावाचे वातावरण

घटनेची माहिती मिळताच भोसरी एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी कंटेनर चालकाला ताब्यात घेतले असून त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे. पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे मोशी परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मद्यधुंद वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

> "हा प्रकार अतिशय धोकादायक आहे. कंटेनर इतक्या वेगाने धावत होता की समोर आलेल्या वाहनांना टाळता येत नव्हते. ही फक्त आर्थिक हानी नाही, तर जीविताचीही मोठी हानी होऊ शकली असती. अशा चालकांवर कडक कारवाई होणे गरजेचे आहे.".
>
> – रमेश पाटील, मोशी भाजी मंडई परिसरातील दुकानदार.

# सायबर सुरक्षाबाबत पुण्यात राज्यस्तरीय कार्यशाळा

## शिक्षण विश्व: डिजिटल जगात सुरक्षितता आणि सजगतेचा संदेश

**महाईन्यूज । पुणे**

**राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिटच्या वतीने १६ ते १८ फेब्रुवारी दरम्यान तीन दिवसांची राज्यस्तरीय सायबर सुरक्षा कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न झाली. कार्यशाळेला SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY चे प्रायोजन लाभले होते. या वर्षी कार्यशाळेचा विषय होता "यह नया भारत है – साइबर सुरक्षा में सशक्त और खतरों के प्रति सतर्क".**



कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. बी. बी. वाफरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ओमेन थॉमस आणि आनंद कार्येकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाने कार्यशाळेला उत्साहवर्धक प्रारंभ मिळाला.

कार्यशाळेत सायबर गुन्हे, माहिती तंत्रज्ञान कायदा २०००, सायबर सुरक्षेतील नवीन प्रवाह, सायबर हायजिन, सायबर तक्रारी नोंदविण्याची प्रक्रिया तसेच विकसित भारत २०४७ साकारण्यासाठी सायबर सजग युवकांची भूमिका यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल सत्रांचे आयोजन करण्यात आले. सुरक्षित डिजिटल वातावरण निर्मितीसाठी पालक, शिक्षक, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांची भूमिका यावर पॅनेल चर्चा देखील झाली.

कार्यशाळेत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. बरीन शेख, शिवप्रसाद जाधव, यद्रेश चव्हाण, ॲड. जयेश भांडेकर, ॲड. वैभव साळुंखे आणि पुष्पक शिरुडे यांचा समावेश होता. कार्यक्रमात "CYBER SAFE BHARAT" या संकल्पनेवर आधारित दीपोत्सव तसेच सायबर सुरक्षा विषयावरील पथनाट्य यांसारखे अभिनव उपक्रम देखील यशस्वीपणे सादर करण्यात आले. महाराष्ट्रातील विविध भागांतील विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.



समारोप समारंभासाठी डॉ. गणेश भामे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी स्वयंसेवकांना डिजिटल माध्यमांचा सुरक्षित वापर करण्याचे आवाहन केले आणि नागरिकांमध्ये सायबर जनजागृती करण्यावर भर दिला. या वेळी उपसंचालक डॉ. अक्षदा कुलकर्णी, विविध शाळांचे अधिष्ठाता, विभागप्रमुख तसेच मान्यवर उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन प्रा. अरविंद वाघस्कर यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनामुळे स्वयंसेवकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत सजगता आणि डिजिटल जबाबदारीची जाणीव अधिक दृढ झाली.

> सायबर सुरक्षा ही फक्त तंत्रज्ञानाची गरज नाही, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. युवकांनी डिजिटल माध्यमांचा सुरक्षित आणि सजग वापर करून समाजात सकारात्मक बदल घडवले पाहिजेत.
>
> - डॉ. बी. बी. वाफरे.



# शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांनी विविध प्रश्नांवरून प्रशासनाला घेरले..!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराला होणारा प्रदूषित पाणीपुरवठा, मोकाट श्वानाची दहशत, प्रशासकीय राजवटीत झालेला चुकीचा कारभार अशा विविध प्रश्नांवरून शिवसेना गटनेते विश्वजित बारणेपहिल्याच सर्वसाधारण सभेत महापालिका प्रशासनाला घेरले. विश्वजित यांनी पहिलेच भाषण अभ्यासपूर्ण आणि इंग्रजीमध्ये भाषेत केले. विश्वजित यांचे भाषण सुरू असताना सभागृह शांत होते. त्यांनी अभ्यासपूर्ण मांडणीने सभागृहाचे लक्ष वेधले.**





विश्वजित बारणे यांनी पाणी प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष वेधले. शहरातील पाणी प्रश्न अतिशय गंभीर झाला आहे. विस्कळीत, अपुरा, दूषित, अनियमित पाणीपुरवठा होत आहे. विस्कळीत पाणी पुरवठ्यामुळे नागरीक त्रस्त आहेत. महापालिका रावेत बंधाऱ्यातून अशुद्ध पाणी उपसा करते. येथील पाणी अतिशय दूषित आहे. येथील पाणी उचलून महापालिका त्यावर प्रक्रिया करून नागरिकांना देत आहे. मात्र, हे पाणी अतिशय दूषित असून या पाण्यामुळे भविष्यात कॅन्सरचे रुग्ण वाढण्याची भीती विश्वजित बारणे यांनी व्यक्त केली. मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रयत्नातून शिवणे येथे बंधारा बांधला आहे. महापालिकेने रावेतऐवजी शिवणे बंधाऱ्यातून शुद्ध पाणी उचलावे. त्यावर प्रक्रिया करून शहराला पाणीपुरवठा करावा.

चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीत अनागोंदी कारभार झाला आहे. अधिकाऱ्यांनी जनहिताची कोणतीही कामे केली नाहीत. खर्चीक कामे काढण्यावर भर दिला. परिणामी, प्रशासकीय राजवटीत महापालिका कर्जबाजारी झाली आहे. प्रशासकीय राजवटीमधील कामांची यादी प्रसिद्ध करावी. त्याचे लेखापरीक्षण करावे. जलनिस्सारण वाहिनीचे काम दर्जेदार झाले नाही. वाहिनी तुंबत आहे. त्यामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याकडेही बारणे यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

### श्वानाची निघते रॅली..

थेरगाव परिसरात मोकाट श्वानाचा प्रश्न अतिशय गंभीर झाला आहे. टोळीने श्वान फिरतात. निवडणुकीमध्ये प्रचारासाठी सर्व उमेदवारांनी रॅली काढली असेल. त्याचप्रमाणे थेरगाव परिसरात रात्रीच्या वेळी श्वानांची रॅली निघते. त्यामुळे मोकाट श्वानाचा बंदोबस्त करावा. नसबंदी वाढवावी. श्वानासाठी शेल्टरची सुविधा निर्माण करण्याची मागणीही बारणे यांनी केली.

### तरुणांना संधी द्या..

महापालिका सभागृहात माझ्यासह यश साने, सिद्धार्थ बनसोडे असे तरुण नगरसेवक निवडून आले आहेत. आम्ही युवकांचे प्रतिनिधित्व करतो. त्यामुळे महापौर रवी लांडगे यांनी तरुण नगरसेवकांना अधिक बोलण्याची संधी देण्याची मागणीही त्यांनी केली.

# ‘अजितसृष्टी’ उभारणीच्या प्रस्तावाला मंजुरी!

## आमदार महेश लांडगे यांची सूचना : सर्वसाधारण सभेत सर्वपक्षीय नगरसेवकांची मान्यता

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकीय व विकासाच्या इतिहासात महत्त्वपूर्ण ठरणारा निर्णय महापालिका सर्वसाधारण सभेत एकमताने घेण्यात आला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या आवारात “अजितसृष्टी” उभारण्याच्या प्रस्तावाला सर्वपक्षीय नगरसेवकांनी मंजुरी दिली. याबाबत महापौर रवि लांडगे यांनी घोषणा केली.**







दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या विकासात योगदान दिले आहे. त्यांच्या स्मरणार्थ पिंपरी-चिंचवडमध्ये “अजितसृष्टी” उभारण्यात यावी, अशी सूचना भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली होती. यावर महापौर आणि सभागृहातील पदाधिकारी-नगरसेवकांनी सर्वानुमते पाठिंबा दिला आणि प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. याबाबत आमदार लांडगे यांनी सभागृह आणि पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

चिंचवड येथील डी-मार्टसमोरील सुमारे 33.86 एकर जागेत महापालिकेची नवीन प्रशासकीय इमारत उभारली जात असून, त्यापैकी 8.65 एकर जागेवर मुख्य इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. भविष्यात संपूर्ण महापालिकेचे प्रशासकीय कामकाज याच भव्य इमारतीतून चालणार आहे. याच परिसरात अजितदादांच्या स्मरणार्थ भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

“अजितसृष्टी”मध्ये शहराच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या विकासाचा इतिहास, औद्योगिक प्रगती, नागरी सुविधा विस्तार आणि भविष्यातील विकास आराखड्याची ‘फ्युचर प्रिंट’ साकारण्यात येणार आहे. तसेच अजितदादांचा ब्राँझमधील पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार असून, जुन्या प्रशासकीय



भवनातील सभागृहात त्यांचे तैलचित्र बसविण्यात येणार आहे. नव्या इमारतीतील प्रमुख सभागृहाला देखील अजितदादांचे नाव देण्याचा निर्णय सभेत घेण्यात आला.

दरम्यान, महापौर रवि लांडगे यांनी सभेत महत्त्वपूर्ण घोषणा करत प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले की, महापालिका प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तसेच सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामाची संयुक्त पाहणी करण्यात यावी. यासोबतच त्या ठिकाणी “अजितसृष्टी” उभारण्याबाबत आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही तातडीने सुरू करण्यात यावी, असेही त्यांनी निर्देशित केले.

> “लोकनेते दिवंगत अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी दिलेले योगदान बहुमूल्य आहे. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये ‘अजितसृष्टी’ उभारण्याच्या प्रस्तावाला एकमताने मंजुरी दिल्याबद्दल महापौर, पदाधिकारी आणि सर्व नगरसेवकांचे मनःपूर्वक आभार मानतो. हा निर्णय पिंपरी-चिंचवडच्या विकासदृष्टीला आणि एकात्मतेला बळ देणारा ठरेल.”
>
> – महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# वायसीएम रूग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह!




**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वाय. सी.एम.एच.) येथील सुरक्षा व्यवस्थेबाबत गंभीर त्रुटी असल्याचा मुद्दा समोर आला आहे. विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी रुग्णालयाच्या पाहणी दौऱ्यानंतर आयुक्तांकडे लेखी निवेदन सादर करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.**

भेटीदरम्यान रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर सक्षम सुरक्षा यंत्रणा नसल्याचे निदर्शनास आल्याचे त्यांनी नमूद केले. येणाऱ्या नागरिकांची मेटल डिटेक्टर मशीन किंवा बॅग तपासणी यंत्राद्वारे तपासणी होत नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीत आढळल्याचे निवेदनात म्हटले आहे.

भाऊसाहेब भोईर यांनी म्हटले आहे की, शहरातील समाजकंटकांकडून रुग्णालय परिसरात अनुचित व हिंसक प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत रुग्ण, डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. बॉम्ब किंवा इतर घातक शस्त्रांच्या वापराची शक्यता लक्षात घेता प्रवेशद्वारावर अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा उभारणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासंदर्भात रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर मेटल डिटेक्टर मशीन व बॅग स्कॅनिंग मशीन बसवण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दरम्यान, या मागणीवर महानगरपालिकेकडून काय भूमिका घेतली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. रुग्णालयात दररोज हजारो नागरिक उपचारासाठी येत असल्याने त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रुग्णालयातील काही कर्मचारी आणि रुग्णांच्या नातेवाईकांनीही सुरक्षेच्या मुद्द्यावर चिंता व्यक्त केली आहे. रुग्णालयात दिवसाला हजारो नागरिकांची ये-जा होत असल्याने प्रवेशद्वारावर किमान प्राथमिक तपासणी व्यवस्था असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात कोणतीही अनुचित घटना टाळण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा अधिक सक्षम करणे, अतिरिक्त सुरक्षा रक्षक नेमणे आणि प्रवेश नियंत्रण प्रणाली लागू करणे आवश्यक असल्याची मागणी पुढे येत आहे.

> "यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे पिंपरी-चिंचवडकरांसाठी अत्यंत महत्त्वाचे आरोग्य केंद्र आहे. दररोज हजारो नागरिक येथे उपचारासाठी येतात, पण प्रवेशद्वारावर मूलभूत सुरक्षा यंत्रणाच नसणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. मेटल डिटेक्टर नाही, बॅग तपासणी नाही – अशा निष्काळजीपणामुळे रुग्ण, डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. एखादी अनुचित घटना घडल्यानंतर जागे होण्यापेक्षा प्रशासनाने आताच कठोर आणि तातडीची पावले उचलली पाहिजेत. मी आयुक्तांना स्पष्ट सांगितले आहे की, अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा त्वरित बसवावी; अन्यथा याबाबत तीव्र आंदोलन छेडावे लागेल."”
>
> – भाऊसाहेब भोईर, विरोधी पक्षनेता, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# अनुसूचित जातींसाठी ‘अ-ब-क-ड’ आरक्षणाचा निर्धार!

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करा : आमदार अमित गोरखे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील ५९ पोटजातींना आरक्षणाचा समन्यायी लाभ मिळावा यासाठी ‘अ-ब-क-ड’ (ABCD) उपवर्गीकरण तातडीने लागू करावे, अन्यथा राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा भाजपचे आमदार अमित गोरखे यांनी दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही राज्य सरकारकडून कोणतीही ठोस पावले उचलली जात नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.**



१ ऑगस्ट २०२४ रोजी SUPREME COURT OF INDIAच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने अनुसूचित जाती व जमातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण (SUB-CLASSIFICATION) करण्यास कायदेशीर मान्यता दिली. या निर्णयानंतर राज्य सरकारांना आरक्षणातील लाभापासून वंचित राहिलेल्या घटकांना स्वतंत्र उपवर्गीकरणाद्वारे न्याय देता येणार आहे. तेलंगणाने उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करणारे पहिले राज्य म्हणून पुढाकार घेतला असताना, महाराष्ट्रात मात्र यासंदर्भात अद्याप कोणतीही ठोस घोषणा झालेली नाही.

अनुसूचित जातींमधील ५९ पोटजातींपैकी अनेक समाजघटक आजही शिक्षण व नोकरीच्या संधींपासून वंचित असल्याचा दावा आमदार गोरखे यांनी केला. मातंग, चर्मकार, वाल्मिकी, मादिगा आदी समाजांना प्राधान्याने लाभ मिळावा यासाठी ‘अ-ब-क-ड’ वर्गीकरण तातडीने लागू करावे, अशी त्यांची मागणी आहे. हे वर्गीकरण केवळ राजकीय मागणी नसून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अंमलबजावणी करणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. संबंधित समितीच्या अहवालाला गती देऊन लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

### विधीमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन

गेल्या काही वर्षांत ‘अ-ब-क-ड’ आरक्षणासाठी आमदार गोरखे यांनी विविध आंदोलनात्मक पावले उचलली आहेत. २० मे २०२५ रोजी मातंग समाजाच्या वतीने मंत्रालयावर महाआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या आंदोलनात त्यांनी पुढाकार घेतला होता. डिसेंबर २०२५ मध्ये नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात त्यांनी शर्टवर ‘अ.ब.क.ड.’ अशी अक्षरे छापून विधीमंडळाच्या पायऱ्यांवर ठिय्या आंदोलन केले होते. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या विषयावर तातडीची बैठक घेण्याची विनंती केली होती.

### विधीमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन

आरक्षण हा केवळ धोरणात्मक विषय नसून वंचित समाजाच्या भविष्याचा प्रश्न असल्याचे गोरखे यांनी म्हटले आहे. “माझा लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूळ आरक्षणाला १०० टक्के न्याय मिळवून देण्यासाठी आहे. आरक्षण असूनही जर ५९ पोटजातींतील बांधव शिक्षण व नोकरीपासून दूर राहत असतील, तर त्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही,” असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या विषयावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकर निर्णय जाहीर करू, असे आश्वासन दिले होते. मात्र अद्याप कोणताही ठोस निर्णय न झाल्याने समाजात नाराजी वाढत असल्याचे गोरखे यांनी सांगितले.

# शहरात वाढते प्रदूषण; ‘इ-वाहन’ धोरण राबवा; विशाल काळभोर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**देशातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या शहरांपैकी एक असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरासमोर आता वायू प्रदूषणाचे गंभीर आव्हान उभे ठाकले आहे. शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात पोहोचली असून, दुचाकी व चारचाकी वाहनांची संख्या तब्बल २५ लाखांच्या आसपास गेल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. वाढती लोकसंख्या, वेगवान नागरीकरण आणि बेसुमार वाहनवाढ यामुळे शहराच्या हवेची गुणवत्ता सातत्याने खालावत असल्याचे चित्र आहे.**



> “पिंपरी-चिंचवडकरांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही. स्वच्छ हवा हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. वायू प्रदूषणाच्या प्रश्नावर आम्ही केवळ निवेदन देऊन थांबणार नाही, तर महापालिकेकडून ठोस आणि वेळबद्ध कृती आराखडा जाहीर होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा करू. शहराच्या विकासासोबत पर्यावरणाचे संतुलन राखणे हीच आमची प्राथमिकता आहे.
>
> - विशाल काळभोर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.

सध्या शहरातील एअर क्वालिटी इंडेक्स (AQI) पातळी १३५ ते १५० दरम्यान नोंदवली जात असून, ही पातळी WORLD HEALTH ORGANIZATION (WHO) ने निश्चित केलेल्या सुरक्षित मर्यादेपेक्षा सुमारे दहा पट अधिक असल्याचे तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे. परिणामी नागरिकांमध्ये श्वसनाचे विकार, दमा, ॲलर्जी, डोळ्यांची जळजळ तसेच हृदयविकारांचे प्रमाण वाढत असल्याची चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते विशाल काळभोर यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन देत तातडीने ठोस उपाययोजना राबवण्याची मागणी केली आहे. त्यांनी दिलेल्या पत्रात शहरातील धूर, धूळ आणि रसायनमिश्रित धुरावर कठोर अंमलबजावणी करण्यावर भर दिला आहे.

बांधकाम स्थळांवर धूळ नियंत्रणासाठी पाण्याची नियमित फवारणी व जाळी आच्छादन अनिवार्य करावे, औद्योगिक क्षेत्रातील धुराचे उत्सर्जन नियमित तपासणीद्वारे नियंत्रणात ठेवावे, तसेच महापालिकेच्या ताफ्यातील सर्व वाहने टप्प्याटप्प्याने ‘इ’ (इलेक्ट्रिक) वाहनांमध्ये रूपांतरित करण्याचे धोरण जाहीर करावे, अशी त्यांची मागणी आहे. याशिवाय सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करून नागरिकांना खासगी वाहनांऐवजी बस व मेट्रोचा वापर करण्यास प्रोत्साहन द्यावे, शहरात अधिकाधिक हरित पट्टे, वृक्षारोपण व ऑक्सिजन पार्क उभारावेत, तसेच प्रत्येक प्रभागात प्रदूषण मोजणी केंद्रे वाढवून AQI माहिती नागरिकांना उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी नमूद केले आहे.

“विकासाच्या स्पर्धेत शहर पुढे जात असले तरी नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार असेल, तर तो विकास नव्हे. भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ हवा हा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे महापालिकेने तातडीने पर्यावरणपूरक धोरण राबवावे,” असे स्पष्ट मत विशाल काळभोर यांनी व्यक्त केले. शहराच्या झपाट्याने वाढणाऱ्या नागरीकरणासोबत पर्यावरणीय संतुलन राखणे ही आता काळाची गरज बनली आहे. महापालिका प्रशासन या निवेदनावर कोणती भूमिका घेते आणि प्रत्यक्षात कोणत्या उपाययोजना राबवते, याकडे पिंपरी-चिंचवडकरांचे लक्ष लागले आहे.